ePaper
जम्मू-काश्मीरमध्ये पुन्हा ड्रोन हल्ल्याचा प्रयत्न, भारताकडून तात्काळ कारवाई

| वर्ष - 8 । अंक - 280 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

## आतील पानांत

- विराट- अनुष्काचा प्लॅन काय ?
- विराटच्या निवृत्तीवर सचिन झाला भावुक
- ब्लॅकमेल सहन करणार नाही
- भारत-पाकिस्तान अमेरिकेनं मध्यस्थी...

www.mahaenews.com | मंगळवार, दि. 13 मे 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## पंतप्रधान मोदींनी ठणकावले..

# यापुढे चर्चा फक्त POK अन् दहशतवादावरच!

## पाकला सुनावले.. दहशतवाद मुळापासून उपटून काढा, नाहीतर तोच तुम्हाला संपवेल!

। नवी दिल्ली । प्रतिनिधी । महाईन्यूज

**'ऑपरेशन सिंदूर' ला काही काळासाठी स्थगिती देण्यात आल्यानंतर प्रथमच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला संबोधित केले. संपूर्ण देशाला विश्वासात घेऊन त्यांनी पाकिस्तानला मात्र अनेक गोष्टींमध्ये इशारे दिले. याद राखा युद्ध संपलेले नाही..यापुढे 'न्यूक्लिअर ब्लॅकमेलिंग' ची धमकी द्यायची नाही..यापुढे चर्चा होईल, ती पाकव्याप्त काश्मीर आणि दहशतवाद याच मुद्द्यांवर, असे त्यांनी ठासून सांगितले.**




### पाकला दहशतवादच गिळून टाकेल..

पाकिस्तानने लवकर शहाणे व्हावे आणि दहशतवाद निपटून काढावा, असे सांगून मोदी म्हणाले की एक दिवस हाच दहशzतवाद पाकिस्तानला गिळून टाकेल.

### पाकिस्तानला थेट तंबी ...

मोदी यांनी आपल्या संबोधनामध्ये अनेक महत्त्वपूर्ण गोष्टींना स्पर्श केला. अनेक मुद्द्यांवर त्यांनी पाकिस्तानला थेट तंबीच दिली आहे. विशेषतः 'न्यूक्लिअर ब्लॅकमेलिंग', पाकव्याप्त काश्मीर आणि दहशतवाद यावर त्यांनी सुनावले.

### दहशतवाद्यांचा बदला..

भारतानं 'ऑपरेशन सिंदूर' राबवून पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा बदला घेतला आहे. पाकव्याप्त काश्मीर आणि पाकिस्तानमध्ये एअर स्ट्राईक करण्यात आला, या एअर स्ट्राईकमध्ये दहशतवाद्यांचे नऊ अड्डे उद्ध्वस्त करण्यात आले. त्यांनी स्पष्टपणे सुनावले की येथून पुढे 'न्यूक्लिअर ब्लॅकमेलिंग' चालणार नाही. त्याचा फटका लगेच देऊ.

### नेमकं काय म्हणाले मोदी?

भारताच्या 'ऑपरेशन सिंदूर' मध्ये १०० हून अधिक खतरनाक दहशतवादी ठार झाले, दहशतवाद्यांचे अनेक 'आका' गेल्या तीन दशकापासून पाकिस्तानात जाहीरपणे फिरत होते. भारताविरोधात कारस्थाने रचत होते. भारताने एका झटक्यात त्यांचा खात्मा केला.

पाकिस्तान रांगायला लागले. जेव्हा पाकिस्तानकडून याचना केली गेली. पाकिस्तानकडून जेव्हा सांगितलं गेलं की त्यांच्याकडून यापुढे कोणतीही दहशतवादी कारवाई केली जाणार नाही. सैन्य गोळीबार होणार नाही. त्यांनी लोटांगण घालून रांगणे पसंद केले. त्यावर भारताने विचार केला. आम्ही सध्या 'ऑपरेशन सिंदूर' फक्त स्थगित केलं आहे, येत्या काळात आम्ही पाकिस्तान काय भूमिका घेतो, कसा वागतो, हे पाहणार आहोत, असा इशारा यावेळी मोदी यांनी पाकिस्तानला दिला आहे.

### छोट्या छोट्या वेगवेगळ्या चौकटी करा

1. पाकिस्तानची फौज.. पाकिस्तानचे सरकार.. ज्या पद्धतीने दहशतवाद्यांना खतपाणी घालत आहे, एक दिवस असा येईल की पाकिस्तानला ते गिळून टाकतील..
2. दहशतवाद आणि चर्चा,.. एकत्र राहू शकत नाहीत. दहशतवाद आणि व्यापार.. एकत्र चालू शकत नाही.. पाणी आणि रक्त एकत्र वाहू शकत नाही, हे पाकिस्तानने लक्षात घ्यावे.
3. सीमेपलीकडून वार करायची तयारी पाकिस्तानने केली होती. पण, भारताने घुसून पाकिस्तानच्या थेट छातीवरच वार केला आहे.
4. दहशतवादाविरुद्धच्या लढाईने एक नवीन लक्ष्मणरेषा आखून घेतली आहे. नवीन कूटनीती, नवीन युद्धनीती आणि धडा शिकवण्याची नवीन पद्धत दाखवून दिली आहे.
5. यापुढे पाकिस्तानशी चर्चा होईल ती फक्त दहशतवाद आणि पाकव्याप्त काश्मीर याच विषयांवर !

### भारताचे स्पष्ट धोरण..

मोदी म्हणाले की, भारताचे तिन्ही दल, बीएसएफ, अर्ध सैनिक दल सतत अलर्टवर आहेत. सर्जिकल स्ट्राईक आणि एअर स्ट्राईक नंतर आता 'ऑपरेशन सिंदूर' ! दहशतवादाच्या विरोधात भारताचं हे धोरण आहे. 'ऑपरेशन सिंदूर' ने दहशतवादाच्या विरोधातील लढाईत आता नवीन लक्ष्मण रेषा आखली आहे.

### हल्ला झाला तर थेट उत्तर

पहिली म्हणजे, भारतावर दहशतवादी हल्ला झाला तर थेट उत्तर देणार. आमच्या पद्धतीने आमच्या अटीवर उत्तर देत राहणार. प्रत्येक ठिकाणी जाऊन कठोर कारवाई करणार, असं मोदी यांनी म्हटलं आहे.

# पुण्यात पाण्याचा गैरवापर भोवणार!

## दंडात्मक कारवाईसह महानगरपालिका नळजोडही तोडणार

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहरात ज्या भागात पिण्याच्या पाण्याचा वापर गाड्या धुणे, बागकाम तसेच रस्ते धुण्यासाठी केला जातो, तेथील नागरिकांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. तरीही सुधारणा न झाल्यास प्रसंगी त्यांचा नळजोड तोडण्यात येणार आहे. शहरातील सर्व भागांतील नागरिकांना समान आणि पुरेसे पाणी मिळावे, यासाठी महापालिकेने समान पाणीपुरवठा योजना सुरू केली आहे.**




वडगाव बुद्रुक जलशुद्धीकरण केंद्रातून कात्रज, भारती विद्यापीठ, कोंढवा, सिंहगड रस्ता, धायरी, आनंदनगर, सनसिटी, धनकवडी या भागांना पाणी दिले जाते. मात्र, या भागात लोकसंख्या वाढली असल्याने नागरिकांना पुरेसे पाणी देण्यास अडचणी येत आहेत.पाण्याची नासाडी होऊ नये, यासाठी टाक्यांना लावण्यात आलेले बॉल काही सोसायट्यांचे खराब झाल्याचे निदर्शनास आले आहे. तर, काही नागरिक वॉशिंग सेंटर, बागकाम तसेच रस्ते धुण्यासाठी पिण्याच्या पाण्याचा वापर करत असल्याचे प्रकार समोर आले आहेत. त्यामुळे याची शहानिशा करून याला आळा घालण्यासाठी पाणीपुरवठा विभागाने पावले उचलली आहेत, असे पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख नंदकिशोर जगताप यांनी सांगितले. धरणातील उपलब्ध पाणीसाठा महापालिकेला मंजूर झालेला कोटा आणि दररोज लागणारे पाणी याचा दर आठवड्याला पाणीपुरवठा विभागाच्या वतीने आढावा घेतला जातो. यामध्ये कोणत्या भागातून अपुऱ्या पाणीपुरवठ्याबाबत तक्रारी आल्या, याची माहिती घेतली जाते. काही जुन्या सोसायट्यांमध्ये पाणी पुरेसे मिळत नसल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. त्यामुळे अशा सोसायट्यांमध्ये जाऊन अभियंत्यांनी तपासणी करावी, अशा सूचना देण्यात आल्याचे जगताप यांनी सांगितले.

### पुरेसे पाणी देण्यास अडचणी

असल्याने नागरिकांना पुरेसे पाणी देण्यास अडचणी येत आहेत.पाण्याची नासाडी होऊ नये, यासाठी टाक्यांना लावण्यात आलेले बॉल काही सोसायट्यांचे खराब झाल्याचे निदर्शनास आले आहे. तर, काही नागरिक वॉशिंग सेंटर, बागकाम तसेच रस्ते धुण्यासाठी पिण्याच्या पाण्याचा वापर करत असल्याचे प्रकार समोर आले आहेत. त्यामुळे याची शहानिशा करून याला आळा घालण्यासाठी पाणीपुरवठा विभागाने पावले उचलली आहेत, असे पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख नंदकिशोर जगताप यांनी सांगितले. धरणातील उपलब्ध पाणीसाठा महापालिकेला मंजूर झालेला कोटा आणि दररोज लागणारे पाणी याचा दर आठवड्याला पाणीपुरवठा विभागाच्या वतीने आढावा घेतला जातो.

सोसायटीच्या वितरण व्यवस्थेमुळे पाण्याची गळती होत असल्याचे समोर आल्यानंतर संबंधितांना ही गळती दुरुस्ती करण्याची नोटीस देण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना देण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.पाण्याचा अपव्यय करणाऱ्या नागरिकांवर कारवाई करण्याचे आदेश पाणीपुरवठा विभागातील कनिष्ठ अभियंत्यांना देण्यात आले आहेत. हा प्रकार समोर आल्यानंतर प्रथम नोटीस दिली जाईल. त्यानंतर दंडात्मक कारवाई केली जाईल. त्यानंतरही त्यामध्ये सुधारणा न झाल्यास आणि पाणी वाया जात असल्याचे लक्षात येताच संबंधितांना कोणतीही पूर्वसूचना न देता थेट नळजोड तोडण्याची कारवाई केली जाणार आहे. वडगाव बुद्रुक जलशुद्धीकरण केंद्रातून कात्रज, भारती विद्यापीठ, कोंढवा, सिंहगड रस्ता, धायरी, आनंदनगर, सनसिटी, धनकवडी या भागांना पाणी दिले जाते. मात्र, या भागात लोकसंख्या वाढली.

# पुण्याच्या प्रवेशद्वारांजवळ अद्ययावत स्वच्छतागृहे

## पुणे स्टेशन परिसरात ही स्वच्छतागृहे उभारण्यात येणार

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कामानिमित्त दिवसभर घराबाहेर असलेल्या नागरिकांच्या सोयीसाठी महापालिकेने वातानुकुलित (एसी) स्वच्छतागृहे उभारण्याचा निर्णय घेतला आहे. शहराच्या प्रवेशद्वारांजवळ, तसेच पुणे स्टेशन परिसरात ही स्वच्छतागृहे उभारण्यात येणार असून, याचा उपयोग प्रामुख्याने महिलांना होणार आहे. या स्वच्छतागृहांसाठी महापालिकेने प्रस्ताव मागविले आहेत. या स्वच्छतागृहांमध्ये वायफाय, मोबाइल आणि लॅपटॉप चार्जिंग सुविधा असणार आहे. नागरिकांना ठरावीक शुल्क भरून स्वच्छतागृहाचा वापर करता येणार आहे.**




शहरात दररोज हजारो नागरिक नोकरी, व्यवसायानिमित्त घराबाहेर पडतात. शहरात महापालिकेच्या वतीने अनेक भागांत नागरिकांसाठी स्वच्छतागृहांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

मात्र, त्याची स्वच्छता योग्य पद्धतीने केली जात नसल्याने त्याचा फारसा वापर केला जात नाही.गेल्या महिन्यात उपमुख्यमंत्री, पालकमंत्री अजित पवार यांनी घेतलेल्या एका बैठकीत पुण्यात येणाऱ्या प्रवाशांना अद्ययावत स्वच्छतागृहांची व्यवस्था उपलब्ध करून द्यावी, अशा सूचना दिल्या होत्या. शहराच्या प्रवेशद्वाराजवळ तसेच पुणे स्टेशन परिसरात ही 'व्हीआयपी' स्वच्छतागृहे उभारावीत, असेही त्यांनी सांगितले होते.या पार्श्वभूमीवर पुणे महापालिकेने शहरात सात ठिकाणी अद्ययावत आणि वातानुकूलित स्वच्छतागृहे उभारण्याचा निर्णय घेतला आहे. या स्वच्छतागृहांमध्ये वायफाय, मोबाइल आणि लॅपटॉप चार्जिंगचीही सुविधा असणार आहे.

एका 'व्हीआयपी' स्वच्छतागृहासाठी सर्वसाधारण ५० लाख रुपये खर्च येणार आहे. स्वच्छतागृह उभारणे आणि त्यांची

### चार कोटी 31 लाख रुपयांचा खर्च

देखभाल-दुरुस्तीचा खर्च भरून काढता यावा, यासाठी उत्पन्नाचे पर्याय म्हणून संबंधिताला जाहिरातींचे हक्कही देण्याचा विचार महापालिकेने सुरू केला असल्याचे कदम यांनी सांगितले.पुणे शहरात येणाऱ्या प्रवाशांच्या सोयीसाठी सात ठिकाणी अद्ययावत आणि वातानुकूलित स्वच्छतागृहे उभारली जाणार आहेत. यासाठी चार कोटी ३१ लाख रुपयांचा खर्च येणार आहे.

देखभाल करणे यासाठीचे विविध पर्याय महापालिकेकडे उपलब्ध असून, त्यासाठी इच्छुकांकडून प्रस्तावदेखील मागविण्यात आले आहेत. 'पैसे द्या आणि वापरा' या तत्त्वावर ही स्वच्छतागृहे असल्याने त्याची स्वच्छता चांगल्या प्रकारे राहील.

नागरिकांना येथे वेगवेगळ्या सोयीसुविधादेखील उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत, अशी माहिती घनकचरा विभागाचे उपायुक्त संदीप कदम यांनी दिली.या स्वच्छतागृहांमध्ये अंघोळीसाठी आवश्यक व्यवस्था, कपडे बदलण्यासाठी खोली आणि प्रसाधनगृह असेल. याबरोबरच मोबाइल, लॅपटॉप चार्जिंगची सुविधा तसेच वायफाय सुविधादेखील उपलब्ध करून देण्यात येणार आहे. अपंग व्यक्तींनाही याचा वापर करता यावा, यासाठी येथे रॅम्प असणार आहेत. स्वच्छता ठेवण्यासाठी पुरेसे स्वच्छता कर्मचारी तसेच देखभाल दुरुस्तीसाठी कर्मचारी येथे उपलब्ध करून दिले जाणार आहेत.

## पिंपरी-चिंचवड मध्ये चार सदस्यीय प्रभाग पद्धतीने होणार निवडणूक!

# सत्ताधारी महायुतीकडून उमेदवारीसाठी इच्छुकांची चढाओढ!

## महाविकास आघाडीकडून संभाव्य उमेदवारांची चाचपणी सुरू

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गेल्या साडेतीन वर्षांपासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमुळे 'वेट अँड वॉच'च्या भूमिकेत असलेले इच्छुक उमेदवार आता सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर 'ॲक्टिव्ह' झाले आहेत. 2017 च्या प्रभाग रचनेनुसार, आगामी महापालिका निवडणूक होईल. त्यामध्ये भाजपा-राष्ट्रवादी-शिवसेना या राज्यातील सत्ताधारी महायुतीकडून उमेदवारी निश्चित व्हावी. या करिता इच्छुकांनी मोर्चेबांधणी केली आहे. त्या अनुशंगाने काही महत्त्वाचे राजकीय प्रवेश होतील, अशी स्थिती आहे.**



स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चार महिन्यांच्या आत घ्या', असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दि. 6 मे 2025 रोजी दिला आहे. मात्र, आगामी निवडणूक कोणत्या प्रभाग रचनेनुसार होणार? याबाबत अनिश्चितता आहे, अशी चर्चा केली जाते. कारण, या पूर्वीची अर्थात 2017 ची महापालिका निवडणूक चार सदस्यीय प्रभाग पद्धतीने झाली होती. तर, त्यापूर्वीच्या काही निवडणुका एक सदस्यीय, दोन सदस्यीय आणि तीन सदस्यीय पद्धतीने झाल्या आहेत. त्यामुळे दोन की तीन किंवा 2017 प्रमाणे चार सदस्यीय पद्धतीने निवडणूक होईल. याबाबत तर्कवितर्क लावले जात आहेत. मात्र, चार सदस्यीय प्रभाग पद्धती भाजपा महायुतीसाठी हिताची असल्यामुळे त्यावर राज्य सरकारकडून शिक्कामोर्तब होणार आहे. यापूर्वी महापालिकेच्या निवडणुकीची प्रारूप प्रभागरचना दि.1 फेब्रुवारी 2022 रोजी जाहीर झाली होती. ही प्रभागरचना राष्ट्रवादी कॉंग्रेसलाच अनुकूल होती. कारण, महापालिकेतील सत्ताधारी भारतीय जनता पक्षाच्या नगरसेवकांचे प्रभाग विभागले होते. शिवसेनेच्या आशाही पल्लवित झाल्या होत्या. तसेच, प्रभागाचे नकाशे व त्यातील समाविष्ट भाग जाहीर झाला होता. प्रभागासोबत एससी व एसटीची लोकसंख्या दिल्याने कोणत्या प्रभागात त्या वर्गाचे आरक्षण पडणार हेही स्पष्ट झाले होते. एकूण ४६ प्रभाग झाले होते. त्यातील ४५ प्रभाग तीन सदस्यांचे व सांगवी प्रभाग क्रमांक ४६ हा चार सदस्यांचा झाला होता. या प्रभाग पद्धतीला भाजपाने विरोध केला होता.

पिंपरी-चिंचवडमध्ये चिंचवड आणि भोसरी मतदार संघात भारतीय जनता पार्टीचे आमदार शंकर जगताप आणि महेश लांडगे नेतृत्व करतात. पिंपरीतून राष्ट्रवादी अजित पवार गटाचे विधानसभा उपाध्यक्ष आण्णा बनसोडे आहे. विशेष म्हणजे, उमा खापरे आणि अमित गोरखे यांच्या रुपाने भाजपाने दोन विधान परिषदेचे आमदार शहरात दिले आहेत. मावळमधून खासदार श्रीरंग बारणे शिवसेना शिंदे गटाचे प्रतिनिधीत्व करीत आहेत.

### पिंपरी-चिंचवड़ महापालिकेतील 2017 नंतर बलाबल

2002 पासून 2017 पर्यंत सलग 15 वर्ष महापालिकेवर राष्ट्रवादी काँग्रेसचे वर्चस्व होते. मात्र, 2017 मध्ये भारतीय जनता पार्टीने बाजी मारत एकहाती सत्ता मिळवली होती. राष्ट्रवादी कॉंग्रेस, शिवसेना, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेसह अपक्ष पाच नगरसेवक होते. चार अपक्ष भाजपचे समर्थक होते. कॉंग्रेस, आरपीआयसह अन्य छोट्या पक्षांचा एकही सदस्य नव्हता. यावेळी चार सदस्यीय पद्धतीने निवडणूक झाली होती. ३२ प्रभागांमधून १२८ नगरसदस्य निवडून आले होते. भाजपाने पाच वर्षांत तीन जणांना महापौरपदाची संधी दिली होती. शिवाय, अनेक सदस्यांना स्थायीसह विविध विषय समित्यांवर संधी दिली होती. महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात भाजपाच्या पाच माजी नगरसेवकांनी राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला होता.

### इच्छुकांची महायुतीला पहिली पसंती...

शहरातील राजकीय स्थिती महायुतीच्या दृष्टीने पोषक असल्यामुळे इच्छुकांची पहिली पसंती भाजपा महायुतीकडून उमेदवारी मिळवण्यासाठी आहे. दुसरीकडे, महाविकास आघाडी एकत्रितपणे निवडणूक लढण्याच्या तयारीत असून, त्याआधारे संभाव्य उमेदवारांची चाचपणी स्थानिक नेत्यांनी सुरू केली आहे. तसेच, "स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत 1994 ते 2022पर्यंत ज्या पद्धतीने ओबीसींना आरक्षण मिळत होते, त्याच पद्धतीने निवडणुका घेण्यास सुप्रीम कोर्टाने मंजुरी दिली आहे. त्यामुळे ओबीसी प्रमाणपत्र असलेल्या इच्छुकांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत.

## धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या नावाने "पीआयईसीसी" ची ओळख!

### आ.महेश लांडगे यांच्या मागणीला प्रतिसाद; 'पीएमआरडीए' प्रशासनाचा सर्वसाधारण सभेत प्रस्ताव

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (PMRDA) च्या मोशी-बोऱ्हाडेवाडी येथे पेठ क्रमांक 5 व 8 मध्ये उभारण्यात आलेल्या पुणे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन व कन्व्हेंन्शन केंद्राला (PIECC) ला धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे नाव देण्यात येणार आहे. तसा प्रस्ताव PMRDA च्या सर्वसाधारण सभेत मान्यतेसाठी सादर करण्यात येणार आहे.**




बोऱ्हाडेवाडी-मोशी येथे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा जगातील सर्वांत उंच 140 फूटाचा "स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण" भारतीय जनता पार्टीचे आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून उभारण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

पिंपरी-चिंचवडकरांसह शिव-शुंभू प्रेमींसाठी ही अभिमानाची बाब आहे. त्या अनुशंगाने याच परिसरात उभारलेले पुणे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन व कन्व्हेंन्शन केंद्राला धर्मवीर संभाजी राजे यांचे नाव द्यावे, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि PMRDA चे महानगर आयुक्त योगेश म्हसे यांना केली होती.


दरम्यान, महानगर आयुक्त योगेश म्हसे यांनी या मागणीला सकारात्मक प्रतिसाद दिला असून, पेठ क्र. 5 व 8 मोशी येथील औद्योगिक प्रदर्शन केंद्र या आरक्षणाचे नामाभिधान पुणे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन व कन्व्हेंन्शन सेंटर, मोशी, पुणे. असे करण्यात आले आहे. या नावानुसार सदर प्रकल्पाचे प्राधिकरण कार्यालय व शासन अभिखेखी नोंदी

> "अखंड हिंदूस्थानचे श्रद्धास्थान व स्फूर्तीस्थान धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे नाव आंतरराष्ट्रीय दर्जाच्या प्रदर्शन केंद्राला द्यावे, अशी शिव-शुंभप्रेमींची भावना आहे. त्या अनुशंगाने प्रशासनाकडे पाठपुरावा सुरू केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली सदर प्रस्तावाला मान्यता मिळेल, असा विश्वास आहे.
> **- महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

असून, त्या प्रमाणे कामकाज करण्यात येते. त्यामुळे प्रकल्पाचे नावविस्ताराची केलेली मागणीबाबत धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहेत. त्या अनुशंगाने सदर प्रस्ताव तयार करुन प्राधिकरणाच्या सभेच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येईल, असे महानगर आयुक्त योगेश म्हसे यांनी कळवले आहे.

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे पदसिद्ध अध्यक्ष मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली प्राधिकरणाची सर्वसाधारण सभा होते. त्या सभेत मान्यता मिळाल्यानंतर "हिंदूभूषण धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्र" असा नामविस्तार होईल, असा विश्वास आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केला आहे.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### कोणत्याही परिस्थितीत वृत्ती स्थिर ठेवावी

अमानित्व हा देहाचा धर्म आहे. दुसऱ्याचा मोठेपणा राखून आपला मोठेपणा वाढवावा. दंभ हा मनाचा धर्म आहे. तो दुसऱ्याला फसविण्याकरिता नसावा. स्वतःचे कल्याण करून घेण्यापुरताच दंभ असल्यास हरकत नाही. अहिंसा हा देहाचा आणि मनाचा धर्म आहे. अहिंसा ही हेतूवर अवलंबून असते. वाचेने कोणाचे मन दुखवू नये, आणि देहाने परपीडा करू नये. दुसऱ्याचे दोष सांगणे हे हीनपणाचे लक्षण आहे. लौकिकातला मोठेपणा एका जन्माचा घात करतो, पण दंभ आणि हिंसा अनेक जन्मांचा घात करतात. द्वेषामुळे हिंसा घडते, म्हणून आपण कोणाचाही द्वेष करू नये. कामक्रोधादि सर्वच विकार भगवंताच्या आड येतात, पण वैर आणि द्वेष यांसारखा परमार्थाचा नाश करणारा शत्रू नाही. स्वार्थामुळे द्वेष घडतो. स्वार्थ जायला नामासारखे दुसरे साधन नाही. आपली वाचा दुसऱ्याला शिकविण्यासाठी आणि मोठेपणा बाळगण्यासाठी नाही. वाचेने म्हणजे जिभेने बोलता येते आणि खाता येते. नेहमी सत्य आणि गोड बोलावे, आणि खाण्याच्या बाबतीत जीभ आपल्या ताब्यात ठेवावी. स्वतःची चित्तशुद्धी करून घेऊन, संतांचे गुण आपल्या आचरणात आणण्याचा प्रयत्न करावा. अभिमानाचे विष जिथे येते, तिथे नामाची आठवण ठेवावी. हिरण्यकश्यपूच्या ठिकाणी देखील भगवंत नव्हता असे नाही; पण कुंपण फार वाढल्याने शेत दिसेनासे व्हावे, तसे हिरण्यकश्यपूचे झाले. स्वतःच्या ठिकाणी भगवंत आहे हे हिरण्यकश्यपू अभिमानामुळे विसरला. त्यामुळे भगवंताला खांबात दिसावे लागले. अभिमान जरुरीपुरताच ठेवावा. ‘ मी रामाचा आहे ’ असा अभिमान धरावा. नामाची कास धरावी. ‘ नारायणाचे दर्शन व्हावे ’ असे नाही प्रह्लाद म्हणाला, ‘ नाम नाही सोडणार ’ असे म्हणाला. लहानपणाची वृत्ती चांगली असते. लहानपणात चूक नाहीच, आणि सगळा फायदाच असतो. भगवंताजवळ आपण लहान मूल झाल्याशिवाय त्याला कृपेचा पान्हा फुटणार नाही; म्हणून आपण भगवंतापाशी लहान व्हावे. लहानपण हे वयावर अवलंबून नसून, आपल्या वृत्तीवर अवलंबून असते. कोणाविषयीही वाईट विचार मनात आणू नयेत; त्यापासून आपलेच मन गढूळ होते. ‘ माझा प्रपंच जसा व्हायचा असेल तसा होवो, पण तुझा विसर मला पडू देऊ नकोस, ’ असे परमेश्वराला अनन्यतेने म्हणावे. मला खात्री आहे, तो तुमच्या साहाय्याला आल्यावाचून राहणार नाही.

**बोधवचन:- वृत्ती स्थिर करण्यासाठी तिला स्थिर वस्तूवर चिकटवून ठेवली पाहिजे. भगवंत ही अशी एकच वस्तू स्थिर आहे.**



‘स्टेट’मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

# युद्धाला फक्त स्वल्पविराम, अद्याप नाही पूर्णविराम !

**पाकड्यांचे दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त करण्यासाठी भारताने पुकारलेल्या ‘ऑपरेशन सिंदूर’ नंतर भारत आणि पाक यांच्यामध्ये जो काही संघर्ष सुरू सुरू झाला, ते पाहता भीषण युद्ध होण्याची चिन्हे निर्माण झाली होती.**



### गलितगात्र पाकिस्तान..

भारताचे आक्रमक रूप पाहून गलितगात्र आणि गर्भगळीत झालेल्या पाकिस्तानची बचावासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर धावाधाव सुरू होती. एकीकडे अमेरिकेच्या प्रमुखांना भीक मागत असतानाही दुसरीकडे भारतात शेकडो ड्रोन पाठवून उपद्व्याप करतच होता. अर्थात पाकिस्तानचे हे रूप कोणालाच नवे नाही. अमेरिकेच्या मध्यस्थीनंतर दोन्ही देशांनी सशस्त्र कारवाई थांबवण्यास मान्यता दिली आहे. थोडक्यात तात्पुरता युद्धविराम झाला आहे!

### एकीकडे शस्त्रसंधी, दुसरीकडे हल्ले..

शस्त्रसंधी झाल्यानंतर अवघ्या अर्ध्या तासातच भारतावर हल्ले करत पाकिस्तानने शस्त्रसंधीचे उल्लंघन केले. असा दुटप्पीपणा पाकिस्तानने यापूर्वीही अनेकदा दाखवला आहे. कारगिल युद्धाच्या वेळीही घुसखोरांशी आपला संबंध नसल्याचे वारंवार ठासून सांगणारा पाकिस्तान दुसऱ्या बाजूने भारतात घुसखोर कसे पाय रोवून खंबीर उभे राहतील, हेच पाहत होता. याहीवेळी तेच घडत आहे. पाकिस्तानचे जम्मू आणि काश्मीरमधील अखनूर, मेंधर, भिंबेरसह श्रीनगरमध्ये हल्ले सुरूच होते. पहलगाम हल्ल्यानंतर, भारत सरकारने तिन्ही सशस्त्र दलांचे प्रमुख, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार यांनी सतत सल्लामसलत करून एक प्रभावी रणनीती तयार केली होती. जेणेकरून हल्ल्यामुळे पाकिस्तानच्या लष्करी अस्थापनांचे आणि नागरिकांचे मोठे नुकसान होऊ नये.

### मस्तवाल, मुद्दाम पाकिस्तान..

तथापि, भारताच्या कारवाईला प्रत्युत्तर देण्याचा उद्दामपणा पाकिस्तानने केलाच. लढाऊ विमाने आणि ड्रोन वापरून देशातील काही प्रमुख शहरांना ‘लक्ष्य’ करण्याची पाकची नियोजित मोहीम अत्यंत अद्याधुनिक सुरक्षा तंत्रज्ञानामुळे भारताकडून हाणून पाडण्यात आली. पाकिस्तानची अनेक क्षेपणास्त्रे आणि डझनभर आयात केलेले ड्रोन भारतीय जवानांनी जमीनदोस्त केले. दुसरीकडे, भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी जगातील अनेक देशांशी सतत संपर्क साधत दहशतवादाचा आधार घेणाऱ्या पाकिस्तानचा पर्दाफाश केला.

### चीन, तुर्की वगळता सगळेच..

तसे पाहिले तर, चीन आणि तुर्की वगळता, जगातील सर्व प्रमुख देश दहशतवादग्रस्त भारताच्या समर्थनार्थ उभे राहिले आहेत. सौदी अरेबियाचे उपपरराष्ट्रमंत्री अवेल अलिजुबैर आणि इराणचे परराष्ट्रमंत्री अब्बास अपाच चर्चेसाठी दिल्लीत पोहोचले. त्यांना पहलगाम हल्ल्यानंतरच्या परिस्थितीची माहिती देण्यात आली. दहशतवादाला प्रोत्साहन देणे थांबवल्याशिवाय वाटाघाटी करण्यास भारताने नकार दिला आहे. केंद्र सरकार, सर्व सुरक्षा संबंधित विभाग आणि सशस्त्र दलांच्या तिन्ही शाखांनी उत्तम समन्वय राखत ‘ऑपरेशन सिंदूर’ आणि त्यानंतर पाकिस्तानने केलेले हल्ले हाणून पाडण्यासाठी भरपूर गृहपाठ केला. सतत बैठका आणि संवादाद्वारे, या आव्हानाचा सामना करण्याची रणनीती अंमलात आणली गेली, त्याला भरपूर यशदेखील आले.

### हालचाली फक्त चर्चेच्या टेबलापर्यंत..

पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादी हल्ल्यांनंतर दरवेळी भारत हा केवळ राजनैतिक पातळीवर कारवाई करण्याचा प्रयत्न करत राहिला आहे. मुंबईवरील, संसदेवरील हल्ला आणि एअरबेसवरील हल्ल्यांनंतरही नेमकी अशीच परिस्थिती उद्भवली होती. त्यावेळी भारताने आक्रमकता दाखवली नसल्याने आपण काहीही केले तरी भारत तिखट प्रतिक्रिया देणार नाही, असाच समज पाकिस्तान आणि त्याच्या अंतर्गत काम करणाऱ्या दहशतवादी संघटनांनी करून घेतला असावा, हे आता सिद्ध झाले आहे.

### नवा भारत, नवीन रणनीती..

पहलगाम हल्ल्यानंतर ‘ऑपरेशन सिंदूर’ राबवणे, हे नवीन भारताच्या बदललेल्या रणनीतीचे स्वरूप आहे. भारत कोणत्याही दहशतवादी हल्ल्याला तसेच दहशतवादाला आश्रय देणाऱ्या पाकविरुद्ध कठोर कारवाई करून प्रत्युत्तर देईल, असा स्पष्ट संदेश भारताने दिला आहे. भारताने पुलवामा हल्ल्याच्या कटाचे पुरावे आधी संपूर्ण जगाला दिले आणि नंतर कारवाई केली. यामुळेच जगातील सर्व देश भारताच्या समर्थनार्थ उभे राहिले. आता भारताने आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर ते थांबवले आहे. निश्चितच ही रणनीती केवळ मानसिक शक्ती वाढवण्याऐवजी अमेरिका आणि इस्त्रायलच्या धर्तीवर घरात घुसून मारण्याची आहे.

### लढाई भारतालाच लढावी लागणार..

पाक हा दहशतवादी संघटनांच्या सदस्यांना प्रशिक्षण आणि पाठिंबा देतो, हे जगाला पटवण्यात भारताला यश आले असले, तरी केवळ त्यावर भारत निर्धास्त राहू शकत नाही. दहशतवादविरोधातील लढाई आधी भारतालाच लढावी लागणार आहे. शस्त्रसंधीचे उल्लंघन करणाऱ्या पाकिस्तानची नियत स्पष्ट दिसत असताना भारताला यापुढे पाकविरोधात कोणती परिणामकारक भूमिका घ्यावी लागेल,हे अभ्यासांती ठरवावे लागणार आहे.

### पाकिस्तानची विश्वासार्हता शून्य..

भारताची पाकिस्तानशी चर्चा सुरू असून तात्पुरता युद्धविराम सुरू आहे. पण दहशतवादी कारवायांसाठी कुप्रसिद्ध असणाऱ्या पाकिस्तानवर किती विश्वास ठेवायचा हेही पाहिले पाहिजे. भारताने सतत सजग आणि जागृत राहायला हवे. सध्याचा युद्धविराम हा स्वल्पविराम असून तो पूर्णविराम कधीच होणार नाही, हे भारताने लक्षात घ्यायला हवे. मुळात हे आपल्यासारख्या सर्वसामान्यांच्या लक्षात येत आहे तर नरेंद्र मोदी, अमित शाह, राजनाथ सिंह, एस. जयशंकर, अजित डोवाल आणि रणनीती ठरवणारे तिन्ही दलांचे प्रमुख यांच्या लक्षात नक्कीच असणार आणि ते ध्यानात ठेवूनच पुढील युद्धनीती आखली जाणार, यात वेगळे सांगण्यासारखे काय ?

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# शहरातील प्रमुख रस्त्यांचे रुंदीकरण!

## सुशोभीकरण; शिवेंद्रसिंहराजेंकडून 50 कोटींचा निधी

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**सातारा शहरातील प्रमुख रस्त्यांचे रुंदीकरण, सुधारणा आणि सुशोभीकरण करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू झाले आहे. शहरातील पोवई नाका ते विसावा नाका (बॉम्बे रेस्टॉरंट) या रस्त्याची सुधारणा व सुशोभीकरण करण्यासाठी सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रसिंहराजेंच्या माध्यमातून सीआरएफमधून ५० कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला असून लवकरच हा रस्ता उच्च दर्जाचा होणार आहे, अशी माहिती त्यांच्या कार्यालयाकडून प्रसिद्धिपत्रकाव्दारे देण्यात आली आहे.**





सातारा शहरातील प्रमुख रस्त्यांबरोबर अंतर्गत रस्त्यांचे रुंदीकरण, सुधारणा आणि सुशोभीकरण करण्याचे काम सुरू झाले आहे. यातील प्रमुख मार्ग पोवई नाका ते विसावा नाका (बॉम्बे रेस्टॉरंट) या रस्त्याची सुधारणा व सुशोभीकरण करण्यासंदर्भात आढावा बैठक घेतली. या बैठकीला सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता संतोष रोकडे, कार्यकारी अभियंता श्रीपाद जाधव, राहुल अहिरे, प्रशांत खैरमोडे, आर्किटेक्ट प्रसन्न देसाई आदी उपस्थित होते. या रस्त्याचे सुशोभीकरण करताना कोणकोणती कामे, सोयीसुविधा निर्माण केल्या जाणार आहेत याबद्दलच्या आराखड्याची चित्रफितीद्वारे बैठकीत माहिती देण्यात आली. पोवई नाका ते बॉम्बे रेस्टॉरंट या रस्त्याचे कॉंक्रीटीकरण, डिव्हायडर, फुटपाथ, सायकल ट्रॅक, रस्त्याच्या बाजूने बागबगीचे, बंदिस्त गटर यासह पार्किंग सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.सातारा शहर एक ऐतिहासिक शहर आहे.

त्यामुळे रस्त्यांची सुधारणा करताना पर्यटन वाढीचा दृष्टिकोन ठेवून काम करा. रस्त्याचे काम करताना प्रत्येक काम दर्जेदार करण्याची सूचना शिवेंद्रसिंहराजेंनी केली. तसेच हा रस्ता शहरातील सुंदर आणि आकर्षक रस्ता करण्याचा प्रयत्न करा, असेही ते म्हणाले. दरम्यान, पोवई नाका ते वाढे फाटा या रस्त्यावरील कूपर कॉलनी येथील नागरिकांची आणि वाहनचालकांची गैरसोय टाळण्यासाठी रस्त्याच्या रुंदीकरणाचा उपयोग करून याठिकाणी दुतर्फा वाहतूक करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याची सूचना शिवेंद्रसिंहराजेंनी उपस्थित अधिकाऱ्यांना केली अशी माहिती या कार्यालयाने दिली आहे.

सातारा शहरातील प्रमुख रस्त्यांबरोबर अंतर्गत रस्त्यांचे रुंदीकरण, सुधारणा आणि सुशोभीकरण करण्याचे काम सुरू झाले आहे. यातील प्रमुख मार्ग पोवई नाका ते विसावा नाका (बॉम्बे रेस्टॉरंट) या रस्त्याची सुधारणा व सुशोभीकरण करण्यासंदर्भात आढावा बैठक घेतली. या बैठकीला सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता संतोष रोकडे, कार्यकारी अभियंता श्रीपाद जाधव, राहुल अहिरे, प्रशांत खैरमोडे, आर्किटेक्ट प्रसन्न देसाई आदी उपस्थित होते. या रस्त्याचे सुशोभीकरण करताना कोणकोणती कामे, सोयीसुविधा निर्माण केल्या जाणार आहेत याबद्दलच्या आराखड्याची चित्रफितीद्वारे बैठकीत माहिती देण्यात आली. पोवई नाका ते बॉम्बे रेस्टॉरंट या रस्त्याचे कॉंक्रीटीकरण, डिव्हायडर, फुटपाथ, सायकल ट्रॅक, रस्त्याच्या बाजूने बागबगीचे, बंदिस्त गटर यासह पार्किंग सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सातारा शहर एक ऐतिहासिक शहर आहे. त्यामुळे रस्त्यांची सुधारणा करताना पर्यटन वाढीचा दृष्टिकोन ठेवून काम करा. रस्त्याचे काम करताना प्रत्येक काम दर्जेदार करण्याची सूचना शिवेंद्रसिंहराजेंनी केली.

### 50 कोटी रुपये निधी मंजूर

नागरिकांची आणि वाहनचालकांची गैरसोय टाळण्यासाठी रस्त्याच्या रुंदीकरणाचा उपयोग करून याठिकाणी दुतर्फा वाहतूक करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याची सूचना शिवेंद्रसिंहराजेंनी उपस्थित अधिकाऱ्यांना केली अशी माहिती या कार्यालयाने दिली आहे.सातारा शहरातील प्रमुख रस्त्यांचे रुंदीकरण, सुधारणा आणि सुशोभीकरण करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू झाले आहे. शहरातील पोवई नाका ते विसावा नाका (बॉम्बे रेस्टॉरंट) या रस्त्याची सुधारणा व सुशोभीकरण करण्यासाठी सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रसिंहराजेंच्या माध्यमातून सीआरएफमधून ५० कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला.

# काश्मीर हा आंतरराष्ट्रीय मुद्दा नाही!

## मोदींच्या भाषणाआधीच आदित्य ठाकरेंची पोस्ट चर्चेत!

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भारत-पाकिस्तान संघर्षादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आतापर्यंत अनेकवेळा उच्चस्तरीय बैठका घेतल्या. या बैठकांमधून अत्यंत महत्त्वाचे निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी केली. पण या अत्यंत अवघड काळात त्यांनी भारतीयांशी थेट संवाद केला नव्हता. परंतु, आता ते आज ८ वाजता जनतेशी थेट संवाद साधणार आहेत. या संवादाकडे सर्वांचं लक्ष लागलेलं असताना आमदार आदित्य ठाकरे यांचं ट्वीट चर्चेचा विषय ठरला आहे.**



त्यांनी या ट्वीटच्या माध्यमातून अत्यंत महत्त्वाची मागणी केली आहे.आदित्य ठाकरे यांनी पोस्टमध्ये म्हटलंय की, “मला आशा आहे की आज भारत सरकार जगाला हे स्पष्ट करेल की काश्मीर कोणत्याही चर्चेचा भाग नाही.

काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग आहे आणि नेहमीच राहील. हा आंतरराष्ट्रीय मुद्दा नाही, अगदी द्विपक्षीय मुद्दाही नाही. पीओकेचा भाग हा द्विपक्षीय मुद्दा आहे. तो प्रदेश भारताचा आहे आणि तो भारताला परत करावा लागेल.”भारत-पाकिस्तान संघर्षादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आतापर्यंत अनेकवेळा उच्चस्तरीय बैठका घेतल्या. या बैठकांमधून अत्यंत महत्त्वाचे निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी केली. पण या अत्यंत अवघड काळात त्यांनी भारतीयांशी थेट संवाद केला नव्हता. परंतु, आता ते आज ८ वाजता जनतेशी थेट संवाद साधणार आहेत. या संवादाकडे सर्वांचं लक्ष लागलेलं असताना आमदार आदित्य ठाकरे यांचं ट्वीट चर्चेचा विषय ठरला आहे.

त्यांनी या ट्वीटच्या माध्यमातून अत्यंत महत्त्वाची मागणी केली आहे.आदित्य ठाकरे यांनी पोस्टमध्ये म्हटलंय की, “मला आशा आहे की आज भारत सरकार जगाला हे स्पष्ट करेल की काश्मीर कोणत्याही चर्चेचा भाग नाही. काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग आहे आणि नेहमीच राहील. हा आंतरराष्ट्रीय मुद्दा नाही, अगदी द्विपक्षीय मुद्दाही नाही. पीओकेचा भाग हा द्विपक्षीय मुद्दा आहे. तो प्रदेश भारताचा आहे आणि तो भारताला परत करावा लागेल.”

### ठाकरे यांचं ट्वीट चर्चेचा विषय ठरला

त्यांनी या ट्वीटच्या माध्यमातून अत्यंत महत्त्वाची मागणी केली आहे. आदित्य ठाकरे यांनी पोस्टमध्ये म्हटलंय की, “मला आशा आहे की आज भारत सरकार जगाला हे स्पष्ट करेल की काश्मीर कोणत्याही चर्चेचा भाग नाही. काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग आहे आणि नेहमीच राहील. हा आंतरराष्ट्रीय मुद्दा नाही, अगदी द्विपक्षीय मुद्दाही नाही. पीओकेचा भाग हा द्विपक्षीय मुद्दा आहे. तो प्रदेश भारताचा आहे आणि तो भारताला परत करावा लागेल.”भारत-पाकिस्तान संघर्षादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आतापर्यंत अनेकवेळा उच्चस्तरीय बैठका घेतल्या. या बैठकांमधून अत्यंत महत्त्वाचे निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी केली. परंतु, आता ते आज ८ वाजता जनतेशी थेट संवाद साधणार आहेत. या संवादाकडे सर्वांचं लक्ष लागलेलं असताना आमदार आदित्य ठाकरे यांचं ट्वीट चर्चेचा विषय ठरला आहे.

# ब्लॅकमेल सहन करणार नाही!

## ऑपरेशन सिंदूर' नंतर पंतप्रधान मोदींचं पहिलं भाषण

**। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।** पहलगाम हल्ल्याला प्रत्युत्तर देत पाकिस्तान आणि पीओकेमध्ये भारताने केलेल्या 'ऑपरेशन सिंदूर'नंतर आज (१२ मे) पंतप्रधान मोदी यांनी देशाला पहिल्यांदाच संबोधित केले. या भाषणात नरेंद्र मोदी यांना पाकिस्तान आणि पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांना स्पष्ट भाषेत संदेश दिला. भारताने केलेल्या कारवाईत अनेक दहशतवादी तळ आणि १०० हून अधिक दहशतवादी ठार झाल्याचेही मोदी यांनी यावेळी स्पष्ट केले. तसेच भारताविरोधात असा कुठलाई दहशतवादी हल्ला सहन केला जाणार नाही, आणि त्याला सडेतोड उत्तर दिलं जाईल असेही यावेळी मोदी म्हणाले.

२२ एप्रिलला पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी जी क्रूरता दाखवली, त्यामुळे अवघ्या जगाला धक्का बसला. सुट्ट्या घालवण्यासाठी गेलेल्या निर्दोष नागरिकांना धर्म विचारून त्यांच्या कुटुंबीयांसमोर, मुलांसमोर निर्दयपणे ठार करणं हा दहशतवादाचा अत्यंत बीभत्स चेहरा होता. क्रूरता होती. देशाच्या भावनेला तोडण्याचा निंदनीय प्रयत्न होता. माझ्यासाठी ही वैयक्तिक पातळीवर प्रचंड वेदनादायी बाब होती."आपल्या माता-भगिनींच्या कपाळावरून कुंकू पुसण्याचा परिणाम काय होतो. मित्रांनो, ऑपरेशन सिंदूर हे फक्त नाव नाहीये. हे देशातल्या कोट्यवधि लोकांच्या भावनांचं प्रतिबिंब आहे. ऑपरेशन सिंदूर न्यायाची अखंड प्रतिज्ञा आहे."जेव्हा पाकिस्तानात दहशतवादी तळांवर भारतीय क्षेपणास्त्रांनी, ड्रोन्सनी हल्ला झाला, तेव्हा दहशतवादी संघटनांच्या इमारतीच नाही, तर त्यांचा धीरही डळमळीत झाला....दहशतवाद्यांनी आपल्या भगिनींचं कुंकू पुसलं होतं. त्यामुळेच भारतानं दहशतीची ही मुख्यालयं उद्ध्वस्त केली. या कारवाईत १०० हून अधिक क्रूरकर्मा दहशतवाद्यांना कंठस्नान घातलं आहे...त्यांना भारतानं एका



झटक्यात संपवलं.""पाकिस्ताननं आपल्या लष्करी तळांना लक्ष्य केलं. पण यातही पाकिस्तान स्वत: उघडा पडला. जगानं पाहिलं की कशा प्रकारे पाकिस्तानचे ड्रोन, क्षेपणास्त्रं भारतासमोर निष्प्रभ झाले....पाकिस्तानची तयारी सीमेवर वार करण्याची होती. पण भारतानं पाकिस्तानच्या छातीवरच वार केला."पाकिस्तानमध्ये बसलेल्या दहशतवादी तळांना आपण उद्ध्वस्त केलं. त्यामुळे पाकिस्तानकडून जेव्हा हे म्हटलं गेलं की त्यांच्याकडून यापुढे कोणतीही दहशतवादी कारवाई किंवा लष्करी कारवाई केली जाणार नाही. तेव्हा भारतानंही त्यावर विचार केला."मी पुन्हा सांगतो, आपण पाकिस्तानच्या दहशतवादी व लष्करी तळांवरील आपली कारवाई फक्त स्थगित केली आहे. येत्या काही दिवसांत आपण पाकिस्तानच्या हालचाली या निकषांवर पाहू की ते काय पाऊल उचलतात."सर्जिकल स्ट्राईक आणि एअर स्ट्राईकनंतर आता ऑपरेशन सिंदूर हेच दहशतवादाविरोधात भारताचं धोरण आहे. ऑपरेशन सिंदूरनं दहशतवादविरोधातील लढ्यात एक नवी रेषा, नवी पद्धत निश्चित केली आहे."भारतावर दहशतवादी हल्ला झाला, तर सडेतोड उत्तर दिलं जाईल. आम्ही आपल्या पद्धतीने, आपल्या अटींवर उत्तर देणारच. त्या प्रत्येक ठिकाणी जाऊन कठोर कारवाई केली जाईल...दहशतवाद आणि चर्चा एकत्र होऊ शकत नाही. दहशतवाद आणि व्यापार एकत्र नाही चालू शकत. शिवाय पाणी आणि रक्तही एकत्र नाही वाहू शकत. मी आज जागतिक समूहालाही सांगेन, आमचं हे धोरण राहिलं आहे. जर पाकिस्तानशी चर्चा होणार असेल, तर दहशतवादावरच होईल, पाकव्याप्त काश्मीरवरच होईल."२२ एप्रिलला पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी जी क्रूरता दाखवली, त्यामुळे अवघ्या जगाला धक्का बसला. सुट्ट्या घालवण्यासाठी गेलेल्या निर्दोष नागरिकांना धर्म विचारून त्यांच्या कुटुंबीयांसमोर, मुलांसमोर निर्दयपणे ठार करणं हा दहशतवादाचा अत्यंत बीभत्स चेहरा होता. क्रूरता होती. देशाच्या भावनेला तोडण्याचा निंदनीय प्रयत्न होता. माझ्यासाठी ही वैयक्तिक पातळीवर प्रचंड वेदनादायी बाब होती."आपल्या माता-भगिनींच्या कपाळावरून कुंकू पुसण्याचा परिणाम काय होतो.

### जगाला स्पष्ट भाषेत संदेश

मित्रांनो, ऑपरेशन सिंदूर हे फक्त नाव नाहीये. हे देशातल्या कोट्यवधि लोकांच्या भावनांचं प्रतिबिंब आहे. ऑपरेशन सिंदूर न्यायाची अखंड प्रतिज्ञा आहे."जेव्हा पाकिस्तानात दहशतवादी तळांवर भारतीय क्षेपणास्त्रांनी, ड्रोन्सनी हल्ला झाला, तेव्हा दहशतवादी संघटनांच्या इमारतीच नाही, तर त्यांचा धीरही डळमळीत झाला....दहशतवाद्यांनी आपल्या भगिनींचं कुंकू पुसलं होतं. त्यामुळेच भारतानं दहशतीची ही मुख्यालयं उद्ध्वस्त केली. या कारवाईत १०० हून अधिक क्रूरकर्मा दहशतवाद्यांना कंठस्नान घातलं आहे...त्यांना भारतानं एका झटक्यात संपवलं.""पाकिस्ताननं आपल्या लष्करी तळांना लक्ष्य केलं. पण यातही पाकिस्तान स्वत: उघडा पडला.

# भारत-पाकिस्तान संघर्षात अमेरिकेनं मध्यस्थी केली

## खुद्द अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीच दिली प्रतिक्रिया

**। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।** भारत-पाकिस्तान यांच्यातील तणाव वाढीला लागलेला असताना अमेरिकेने मध्यस्थी करून दोन्ही देशांत शस्त्रविराम जाहीर केला. दरम्यान, दोन देशातील अंतर्गत वादात अमेरिकेने हस्तक्षेप का केला? दोन देशांमध्ये संघर्ष शिगेला पोहोचलेला असताना अचानक दोन्ही देशांनी शस्त्रविराम का पुकारला असा प्रश्न अनेकांच्या मनात निर्माण झाला आहे. यावर आता खुद्द अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीच प्रतिक्रिया दिली आहे.

"शनिवारी माझ्या प्रशासनाने तात्काळ शस्त्रविराम करण्यास



मदत केली,

मला वाटते की भारत आणि पाकिस्तानमध्ये कायमस्वरूपी शस्त्रविराम होईल. या दोन्ही देशांमध्ये भरपूर अण्वस्त्रे आहेत", असं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प म्हणाले.ते पुढे म्हणाले, "तुम्हाला हे सांगताना मला खूप अभिमान वाटतो की भारत आणि पाकिस्तानचे नेतृत्व अढळ आणि शक्तिशाली होते. दोन्ही प्रकरणांमध्ये त्यांच्याकडे परिस्थितीचे गांभीर्य पूर्णपणे जाणून घेण्याची आणि समजून घेण्याची ताकद, शहाणपण आणि धैर्य होते. आणि आम्ही खूप मदत केली आणि व्यापारातही मदत केली. मी म्हणालो आम्ही तुमच्यासोबत खूप व्यापार करणार आहोत. त्यामुळे युद्ध थांबवूया. जर तुम्ही ते थांबवले तर आम्ही व्यापार करत राहू. जर तुम्ही ते थांबवले नाही तर आम्ही कोणताही व्यापार करणार नाही."ते पुढे म्हणाले, "आम्ही एक अणुयुद्ध थांबवले. मला वाटते की ते एक वाईट अणुयुद्ध असू शकले असते. लाखो लोक मारले गेले असते. मी उपराष्ट्रपती जेडी व्हान्स आणि परराष्ट्र सचिव मार्को रुबियो यांचेही त्यांच्या कामाबद्दल आभार मानू इच्छितो..""शनिवारी माझ्या प्रशासनाने तात्काळ शस्त्रविराम करण्यास मदत केली, मला वाटते की भारत आणि पाकिस्तानमध्ये कायमस्वरूपी शस्त्रविराम होईल. या दोन्ही देशांमध्ये भरपूर अण्वस्त्रे आहेत", असं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प म्हणाले.ते पुढे म्हणाले.

### आम्ही व्यापार करणार नाही

, "तुम्हाला हे सांगताना मला खूप अभिमान वाटतो की भारत आणि पाकिस्तानचे नेतृत्व अढळ आणि शक्तिशाली होते. दोन्ही प्रकरणांमध्ये त्यांच्याकडे परिस्थितीचे गांभीर्य पूर्णपणे जाणून घेण्याची आणि समजून घेण्याची ताकद, शहाणपण आणि धैर्य होते. आणि आम्ही खूप मदत केली आणि व्यापारातही मदत केली. मी म्हणालो आम्ही तुमच्यासोबत खूप व्यापार करणार आहोत. त्यामुळे युद्ध थांबवूया. जर तुम्ही ते थांबवले तर आम्ही व्यापार करत राहू. जर तुम्ही ते थांबवले नाही तर आम्ही कोणताही व्यापार करणार नाही."ते पुढे म्हणाले, "आम्ही एक अणुयुद्ध थांबवले. मला वाटते की ते एक वाईट अणुयुद्ध असू शकले असते. लाखो लोक मारले गेले असते.

# दारु प्यायल्यानंतर अक्षय कुमार काय करतो?

बॉलीवूडच्या सुपरस्टार्समध्ये खिलाडी कुमार म्हणजेच अक्षय कुमारचं नाव घेतलं जातं. तो त्याच्या फिटनेस आणि हेल्थच्या बाबतीत कायमच गंभीर असतो. त्यासाठी तो दारु काय चहा सुद्धा पित नाही. पण एकदा अक्षयने खुलासा केला होता की, वाईन प्यायल्यानंतरही त्याला नशा चढते. तेव्हा तो काय करतो याबाबत एक मजेदार किस्सा देखील त्याने या कार्यक्रमादरम्यान सांगितला आहे. अक्षयने सलमान खानच्या दस का दम या कार्यक्रमात हजेरी लावली होती. त्यावेळी त्याने याबाबत मजेशीर खुलासा केला आहे. यावेळी त्याने सांगितलं की, जेव्हा मला वाईन चढते तेव्हा मी जेवण बनवायला लागतो. अक्षयचा हाच व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होतोय. यामध्ये अक्षय कुमारने सांगितलं आहे की, त्याला थोडी वाईन जरी प्यायली तरी त्याची नशा चढते. पण त्याला नशा चढल्यावर तो गात किंवा नाचत नाही, तर जेवण बनवून त्याच्या बायकोला ट्विंकल खन्नाला भरवतो. अक्षयच्या या उत्तरावर कार्यक्रमात एकच हशा पिकला. यावर बोलताना अक्षय कुमारनं म्हटलं की, मी थोडी जरी वाईन पिली तर ती मला चढते. नशेत लोकं खूप काही करतात. काही गातात, काही पडतात रागावतात पण मी जेवण बनवायला सुरुवात करतो. तेव्हा मी माझ्या लायकीवर येतो. खरतर अक्षय ॲक्टर बननण्याआधी शेफ होता. तो कॅनडामध्ये शेफ म्हणून काम देखील करत होता. अक्षयने सांगितलं की, मी फक्त कुकिंगच नाही करत तर ते मी बायकोला देखील भरवतो.

# नवरी मिळे हिटलरला’ची टीम म्हणजे कुटुंब

‘नवरी मिळे हिटलरला’ ही मालिका आज लोकप्रियतेच्या शिखरावर आहे. या मालिकेतील सर्वच पात्रे प्रेक्षकांची मने जिंकताना दिसत आहेत. मात्र, लवकरच ‘नवरी मिळे हिटलरला’ ही मालिका प्रेक्षकांचा निरोप घेणार आहे. झी मराठी वाहिनीवर प्रदर्शित होणारी नवरी मिळे हिटलरला या मालिकेत वल्लरी विराज व राकेश बापट हे कलाकार प्रमुख भूमिकांत दिसत आहेत. त्याबरोबरच भारती पाटील, भूमिजा पाटिल, सानिका काशकर, प्रसाद लिमये, आलापिनी, शर्मिला शिंदे, राजदीप, मिलिंद नंदा असे अनेक कलाकारही प्रमुख भूमिकांत दिसत आहेत.वल्लरी विराजने या मालिकेत लीला ही भूमिका साकारली आहे. एजेची दुसरी पत्नी असलेली लीला सर्वांची आवडती आहे. लग्नाआधी गोंधळ घालणारी, बेशिस्त लीला व एजेबरोबर लग्न झाल्यानंतरची समजूतदार लीला सर्वांची लाडकी आहे. आपल्या माणसांवर प्रेम करणारी ही लीला प्रेक्षकांच्या मनावरदेखील राज्य करते.आता नुकतीच ‘टेली गप्पा’ या युट्यूब चॅनेलला मुलाखतीत वल्लरी विराजने या मालिकेबद्दल भावना व्यक्त केल्या आहेत. वल्लरी विराज म्हणाली, “मी आतापर्यंत जितकं काम केले आहे. त्या प्रोजक्टमधील सगळ्या टीम चांगल्याच होत्या. अमेझॉनची वेब सीरिज स्लम गोल्फची टीम चांगली होती. कन्नी या चित्रपटाचीसुद्धा टीम छान होती आणि ‘नवरी मिळे हिटलरला’ची टीम म्हणजे कुटुंब आहेत.”



# बबिता काय म्हणाली?

‘तारक मेहता का उल्टा चष्मा’ ही छोट्या पडद्यावरील अत्यंत लोकप्रिय मालिका आहे. अनेक वर्षांपासून ही मालिका प्रेक्षकांचं मनोरंजन करतेय. या मालिकेतील प्रत्येक कलाकारानं प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. गेल्या काही वर्षांत या मालिकेतील अनेक भूमिका बदलल्या; मात्र तरीही या मालिकेची लोकप्रियता तसूभरही कमी झाली नाही. या मालिकेत बबिताची भूमिका साकारणारी अभिनेत्री मुनमुन दत्ता सोशल मीडियावर विशेष चर्चेत असते. वयाच्या ३७ व्या वर्षीही मुनमुन अविवाहित व सिंगल आहे. मुनमुन दत्ता अजूनही या शोशी जोडलेली आहे. तिच्या सौंदर्य आणि तिच्या स्टाईलमुळे प्रत्येक जण प्रभावित होतो. हे स्थान मिळविण्यासाठी तिला खूप कष्ट करावे लागले. तिनं तिच्या आईबरोबरच्या नात्याबद्दल सांगितलं आहे. तसेच, ती आर्थिक अडचणींबद्दलही बोलली आहे. आईबरोबरच्या नात्याबद्दल ‘ई टाइम्स’शी बोलताना मुनमुन दत्ता म्हणाली, “एक शब्दही पुरेसा नाही. हे एका रोलर कोस्टरसारखं आहे. आमच्यात प्रेम आहे. आम्ही भांडण करतो. आमच्यात मैत्री आहे. माझ्या आयुष्यात घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीबद्दल मी तिच्याशी बोलू शकते. माझ्या आईचं लग्न खूप लहान वयात झालं आणि तिनं तिचं संपूर्ण आयुष्य

# नेत्रा करणार अस्तिकाचा शेवट

‘सातव्या मुलीची सातवी मुलगी’ ही मालिका सध्या रंजक वळणावर आहे. तसेच लवकरच या मालिकेत मोठी ट्वीस्ट पाहायला मिळणार आहे. कारण लवकरच त्रिनयना देवी अस्तिकाचा शेवट करणार आहे. अस्तिका विरोचकाने दिलेला काळा मणी तिच्याकडे असल्यामुळे सुरक्षित रहात होती. पण ही गोष्ट नेत्राला कळते आणि ती हीच गोष्ट अद्वैतला सांगते. त्याचवेळी रुपालीसुद्धा अस्तिकाला सांगते की अद्वैत-नेत्रा दोघे मिळून तुझा वध करण्याचा प्रयत्न करतील. सध्या मालिकेत अस्तिका ही नेत्रा म्हणून वावरत आहे. त्याचप्रमाणे ती नेत्राला त्रिनयना देवीच्या मूर्तीच्या जागी विरोचकाची मूर्ती आणण्याचं देखील आव्हान देते. पण नेत्रा मात्र अस्तिकाला जशासं तसं उत्तर देते. त्याचसाठी नेत्रा आणि अद्वैत मिळून अस्तिकाचा वध करण्याची योजना आखत असतात. घरातले सगळेजणही त्यांना साथ देतात. पण रुपाली अस्तिकाला सांगते की, ते तुला संपण्याआधीच तू अद्वैतचा जीव घे आणि नागरुपात येऊन खोलीत लपून रहा. दरम्यान रुपालीच्या सांगण्यामुळे अस्तिका पूर्णपणे गोंधळून जाते. काय करावं हेच तिला कळत नाही. त्यानंतर ती अद्वैतच्या प्रेमळ बोलण्यात अडकते. तरीही रूपाली अस्तिकाला अव्दैतच्या जाळ्यातून सोडवते आणि तिला सांगते, की अव्दैतला पुन्हा मारण्याचा प्रयत्न कर.नेत्रा विरोचकाची खेळी पूर्णपणे ओळखते आणि घरातल्या सर्वांना एकत्र रहा असं सांगते. त्यानंतर नेत्रा अस्तिकाचा वध करण्यासाठी काय मार्ग असू शकेल, यावर विचार करते.’सातव्या मुलीची सातवी मुलगी’ मध्ये विरोचक आणि त्रिनयना देवीच्या मुलींमध्ये युद्ध होईल. या युद्धात विरोचकाचा शेवट झाल्यानंतर मालिकेचा शेवट होईल असेही त्यांनी सांगितले. विरोचक संपल्यानंतर मालिकेला काही अर्थच राहणार नाही, त्यामुळे मालिका संपू शकते असा अंदाज त्यांनी वर्तवला.



# लोकांना तो सीन खरंच आवडला नाही का?

ॲनिमल हा सिनेमा डिसेंबर महिन्यात प्रदर्शित झाला होता. बॉक्स ऑफिसवर तुफान कमाई करणारा हा सिनेमा ठरला. या सिनेमात रश्मिका मंदाना, रणबीर कपूर, अनिल कपूर, बॉबी देओल आणि तृप्ती डिमरी मुख्य भूमिकांमध्ये आहेत. संदीप वांगा रेड्डीने हा सिनेमा दिग्दर्शित केला आहे. या सिनेमावरुन बरीच उलटसुलट चर्चा झाली. तसंच सिनेमाचा ट्रेलर जेव्हा प्रदर्शित झाला तेव्हा त्यातल्या एका संवादावरुन रश्मिका मंदानाला चांगलंच ट्रोल करावं लागलं. या ट्रोलिंगवर आता रश्मिकाने मौन सोडलं आहे.ट्रेलरमध्ये जो प्रसंग दाखवण्यात आला होता त्यात रश्मिका मंदाना करवा चौथ्या दिवशी रणबीरवर चांगलीच चिडलेली असते. तसंच रागाच्या भरात ती एक वाक्य बोलून जाते ज्यानंतर रणबीर चिडतो. जे वाक्य ती बोलत असते त्याचा काहीही संदर्भ लागला नसल्याने रश्मिका मंदानाला खूप ट्रोलिंगला सामोरं जावं लागलं. अगदी ती काय बोलते ते समजत नसल्यापासून ते तिने तोंडात सुपारी ठेवून संवाद म्हटला आहे का? इथपर्यंत अनेक प्रकारे तिला ट्रोल केलं गेलं. या सगळ्या प्रकारावर आता रश्मिकाने मौन सोडलं आहे. नेहा धुपियाच्या नो फिल्टर नेहा या टॉक शोमध्ये रश्मिका आली होती. त्या शोमध्येच तिने या मुद्द्यावर मौन सोडलं आहे.“करवा चौथचा तो प्रसंग नऊ मिनिटांचा होता. तो सीन शूट करताना सेटवर जितके लोक होते त्या सगळ्यांना आवडला होता. नऊ मिनिटांचं ते शूट संपल्यावर सगळ्यांनीच टाळ्या वाजवल्या. तो सीन खूप चांगल्या प्रकारे शूट झाला असं सगळ्यांनीच सांगितलं. ट्रेलर जेव्हा प्रदर्शित झाला तेव्हा एका डायलॉगवरुन मला प्रचंड ट्रोल करण्यात आलं. तेव्हा मी असा विचार केला की नऊ मिनिटांचा तो इतका लांबलचक सीन सेटवरच्या लोकांना आवडला होता, मग आता लोक आपल्याला ट्रोल का करत आहेत? मी जणू काही स्वतःभोवती एखादा फुगा फुगवून घेतला होता का? लोकांना तो सीन खरंच आवडला नाही का? तुम्ही काय शूट केलं आहे ते लोकांना माहीत नसतं. त्यांनी १० सेकंदाचा तेवढा एक डायलॉग पाहिला आणि मला ट्रोल करायला सुरुवात केली. ” असं रश्मिकाने म्हटलं आहे.लोकांनी महिलेला तिच्या शरीरावरुन ट्रोल करणं, बॉडी शेमिंग ज्याला आपण म्हणतो ते मला मुळीच आवडत नाही. आता एखाद्या महिलेच्या शरीरावरुन तिला ट्रोल करता येत नसेल तर चित्रपट, त्यातला पेहराव, त्यातली भाषा, संवाद यावरुन ट्रोलिंग होतं. मी कसा परफॉर्मन्स दिला आहे हे मला माहीत आहे असं रश्मिका मंदानाने म्हटलं आहे.ॲनिमल हा सिनेमा डिसेंबर महिन्यात प्रदर्शित झाला होता. बॉक्स ऑफिसवर तुफान कमाई करणारा हा सिनेमा ठरला. या सिनेमात रश्मिका मंदाना, रणबीर कपूर, अनिल कपूर, बॉबी देओल आणि तृप्ती डिमरी मुख्य भूमिकांमध्ये आहेत. संदीप वांगा रेड्डीने हा सिनेमा दिग्दर्शित केला आहे.

# विराट-अनुष्काचा प्लॅन काय?

## क्रिकेटला रामराम केल्यानंतर काय आहे विराटचा प्लॅन?

। नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भारताचा माजी कर्णधार विराट कोहलीने कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीचा निर्णय घेतला आहे. इंस्टाग्रामवर भावूक पोस्ट शेअर करत त्याने निवृत्ती घेत असल्याची घोषणा केली. ही मोठी घोषणा करण्याच्या अवघ्या काही मिनिटांपूर्वी विराट कोहली आणि त्याची पत्नी अनुष्का शर्मा मुंबई विमानतळावर स्पॉट झाले. दरम्यान काही दिवसांपूर्वीच विराटने आपल्या निवृत्ती नंतरच्या योजनांबाबत खुलासा केला होता.**





विराट कोहली हा गेल्या काही वर्षांत सर्वात व्यस्त क्रिकेटपटूंपैकी एक होता. कारण तो तिन्ही प्रारूपात भारतीय संघाचं प्रतिनिधित्व करत होता. टी-२० वर्ल्डकप झाल्यानंतर त्याने टी-२० क्रिकेटला रामराम करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर आता त्याने कसोटी क्रिकेटमधूनही निवृत्तीची घोषणा केली आहे. त्यामुळे आता तो केवळ वनडे क्रिकेट खेळताना दिसून येणार आहे. त्यामुळे आता त्याच्याकडे कुटुंबाला देण्यासाठी पुरेसा वेळ असणार आहे. भारतीय संघाचे सामने नसताना तो आपली पत्नी अनुष्का शर्मा आणि मुलांसह परदेशात सुट्ट्यांचा आनंद घेण्यासाठी जात असतो. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या इनोव्हेशन लॅब समिटमध्ये बोलताना त्याने आपल्या निवृत्ती नंतरच्या योजनांबाबत खुलासा केला होता. याबाबत बोलताना तो म्हणाला होता की, ” निवृत्तीनंतर मी काय करणार आहे हे मला खरंच माहित नाही. मी माझ्या संघ सहकाऱ्याला देखील हाच प्रश्न विचारला होता आणि मलाही हेच उत्तर मिळालं होतं. हो, पण खूप प्रवास करायचा आहे. ”यासह आणखी एका मुलाखतीत विराटला हाच प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावेळीही त्याने निवृत्तीचे संकेत देत म्हटले होते की, “मी निवृत्ती घेतली, की मी निघून जाईल. काही काळासाठी तुम्हाला दिसणार नाही ( हसत म्हणाला). त्यामुळे जोपर्यंत मी खेळत आहे, तोपर्यंत मी माझं सर्वस्व देणार आहे. हिच एक गोष्ट आहे, जी मला पुढे जाण्यास प्रेरणा देते.” यावरून हे स्पष्ट होत आहे की, निवृत्ती घेतल्यानंतर विराट कोहली पुन्हा एकदा लंडनला जाऊ शकतो. कारण क्रिकेटमधून विश्रांती मिळाल्यानंतर तो अनेकदा लंडनमध्ये दिसून आला आहे. अभिनेत्री माधुरी दीक्षितचे पती डॉ. नेने यांनी देखील, विराट कोहली आणि अनुष्का शर्मा लंडनला जाण्याचा विचार करत असल्याचे उघड केले. एका पॉडकास्टमध्ये बोलताना नेने यांनी सांगितले की, “अनुष्का शर्मा आणि विराट कोहली लंडनला जाण्याचा विचार करत होते. कारण इथे ते जे काही करतात ते सर्वांचं लक्ष वेधून घेतं. त्यामुळे इथे त्यांना मिळालेल्या यशाचा आनंद घेता येत नव्हता. विराट आणि अनुष्का खूप चांगले आहेत. त्यांना आपल्या मुलांना सर्वसामान्य आयुष्य द्यायचं आहे.”विराट कोहली हा गेल्या काही वर्षांत सर्वात व्यस्त क्रिकेटपटूंपैकी एक होता. कारण तो तिन्ही प्रारूपात भारतीय संघाचं प्रतिनिधित्व करत होता. टी-२० वर्ल्डकप झाल्यानंतर त्याने टी-२० क्रिकेटला रामराम करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर आता त्याने कसोटी क्रिकेटमधूनही निवृत्तीची घोषणा केली आहे. त्यामुळे आता तो केवळ वनडे क्रिकेट खेळताना दिसून येणार आहे. त्यामुळे आता त्याच्याकडे कुटुंबाला देण्यासाठी पुरेसा वेळ असणार आहे. भारतीय संघाचे सामने नसताना तो आपली पत्नी अनुष्का शर्मा आणि मुलांसह परदेशात सुट्ट्यांचा आनंद घेण्यासाठी जात असतो.

### लंडनला जाण्याचा विचार

याबाबत बोलताना तो म्हणाला होता की, ” निवृत्तीनंतर मी काय करणार आहे हे मला खरंच माहित नाही. मी माझ्या संघ सहकाऱ्याला देखील हाच प्रश्न विचारला होता आणि मलाही हेच उत्तर मिळालं होतं. हो, पण खूप प्रवास करायचा आहे.”यासह आणखी एका मुलाखतीत विराटला हाच प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावेळीही त्याने निवृत्तीचे संकेत देत म्हटले होते की, “मी निवृत्ती घेतली, की मी निघून जाईल. काही काळासाठी तुम्हाला दिसणार नाही ( हसत म्हणाला). त्यामुळे जोपर्यंत मी खेळत आहे, तोपर्यंत मी माझं सर्वस्व देणार आहे. हिच एक गोष्ट आहे, जी मला पुढे जाण्यास प्रेरणा देते.” यावरून हे स्पष्ट होत आहे की, निवृत्ती घेतल्यानंतर विराट कोहली पुन्हा एकदा लंडनला जाऊ शकतो. कारण क्रिकेटमधून विश्रांती मिळाल्यानंतर तो अनेकदा लंडनमध्ये दिसून आला आहे. अभिनेत्री माधुरी दीक्षितचे पती डॉ. नेने यांनी देखील, विराट कोहली आणि अनुष्का शर्मा लंडनला जाण्याचा विचार करत असल्याचे उघड केले. एका पॉडकास्टमध्ये बोलताना नेने यांनी सांगितले.


# विराटच्या निवृत्तीवर सचिन भावुक!

## मला आठवतंय तुझ्या वडिलांचा धागा मला दिलेलास : सचिन

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भारतीय क्रिकेट संघाचा रनमशीन विराट कोहलीने कसोटी क्रिकेटला अलविदा केलं आहे. विराट कोहलीने इन्स्टाग्रामवर पोस्ट शेअर करत कसोटीमधून निवृत्त होत असल्याचे सांगितले. अनेक आजी माजी क्रिकेटपटूंनी विराटच्या कसोटी निवृत्तीबाबत आश्चर्य व्यक्त केलं.**



तर मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरने भावनिक पोस्ट करत सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे.कोहलीच्या निवृत्तीच्या घोषणेमुळे क्रिकेट जगताला नक्कीच धक्का बसला आहे. त्याची पत्नी अनुष्कासह अनेक महान क्रिकेटपटूंनी विराटबद्दल भावनिक पोस्ट लिहिल्या. यापैकी एक नाव 'क्रिकेटचा देव' सचिन तेंडुलकरचे आहे, विराट कोहली सचिन तेंडुलकरला आपला आदर्श मानतो. विराटच्या कसोटी निवृत्तीबाबत लिहिताना सचिनला त्याचा अखेरचा कसोटी सामनाही आठवला.सचिन तेंडुलकरने विराट कोहलीचा पोस्ट करत खाली कॅप्शनमध्ये लिहिले, “तू कसोटीमधून निवृत्त घेत आहेस, यादरम्यान तुझ्या १२ वर्षांपूर्वीच्या त्या कृतीची आठवण करून देतो. माझ्या अखेरच्या कसोटीत तू मला तुझ्या दिवंगत वडिलांनी दिलेला धागा गिफ्ट म्हणून दिला होतास. तू देत असलेलं ते गिफ्ट स्वीकारणं माझ्यासाठी खूप अवघड होतं. पण तुझी ती कृती हृदयस्पर्शी होती आणि जे माझ्याबरोबर अजूनही आहे.”सचिन तेंडुलकर पुढे म्हणाला, “भले मी तुला त्याबदल्यात कोणता धागा दिला नसेल. पण कृपया एक गोष्ट लक्षात ठेव, माझ्या खूप साऱ्या शुभेच्छा आणि कौतुकाचे बोल कायम तुझ्याबरोबर आहेत. विराट तू असंख्य तरूण क्रिकेटपटूंना हा खेळ खेळण्यासाठी प्रेरित केलं आहेस आणि हा तुझा खरा वारसा आहे.”सचिनने शेवटी म्हटलं, “तुझी कसोटी कारकीर्द खूप कमालीची होती. तू फक्त भारतीय क्रिकेटसाठी धावाच केल्या नाहीस. तर भारतीय क्रिकेटला नव्या पिढीतील कमालीचा प्रेक्षक वर्ग आणि खेळाडू दिले आहेस. तुझ्या या स्पेशल कसोटी कारकिर्दीसाठी खूप शुभेच्छा.”विराट कोहलीने सचिन तेंडुलकरला त्याच्या वडिलांनी दिलेला धागा भेट म्हणून दिला होता, हा किस्सा सचिनने अनेकदा त्याच्या मुलाखतींमध्ये सांगितला आहे. सचिन तेंडुलकरचे अनेक विविध विक्रम विराट कोहलीने आपल्या नावे केले आहेत.

### कसोटी कारकिर्दीसाठी खूप शुभेच्छा

मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरने भावनिक पोस्ट करत सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे.कोहलीच्या निवृत्तीच्या घोषणेमुळे क्रिकेट जगताला नक्कीच धक्का बसला आहे. त्याची पत्नी अनुष्कासह अनेक महान क्रिकेटपटूंनी विराटबद्दल भावनिक पोस्ट लिहिल्या. यापैकी एक नाव 'क्रिकेटचा देव' सचिन तेंडुलकरचे आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती
। मंगळवार।
। दि. 13 मे 2025।

# ग्रामीण भागात उद्यमशीलतेच्या संधी निर्माण करणार : विनायक भोंगाळे

## शिक्षण विश्व: योगेश एंटरप्रायजेसतर्फे यशस्वी कॅम्पस ड्राइव्ह

। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**आपल्या जन्मभूमीतील मुलांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करणे हे माझे कर्तव्य आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये सर्व आवश्यक कौशल्ये असतात. किंबहुना त्यांच्यात व्यवहारज्ञान अधिक असते. केवळ संधी न मिळाल्याने या मुलांना मागे राहावे लागते म्हणूनच ही संधी देण्याचा आमचा प्रयत्न आहे असे योगेश एंटरप्रायजेसचे संस्थापक व अध्यक्ष विनायक भोंगाळे म्हणाले.**



सातपुडा एज्युकेशन सोसायटीच्या आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज, संग्रामपूर येथे योगेश एंटरप्रायजेसच्या वतीने कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्ह यशस्वीरीत्या पार पडली.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांसाठी करिअर घडवण्याची एक सुवर्णसंधी उपलब्ध झाली. या कॅम्पस ड्राइव्हला विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ग्रामीण भागातील कला व वाणिज्य महाविद्यालयात आयोजित होणारा हा पहिलाच कॅम्पस ड्राइव्ह असल्याने विद्यार्थ्यांना एका नव्या अनुभवाला सामोरे जाण्याची संधी मिळाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कॉलेजचे प्राचार्य डॉ. श्रीराम येरणकर होते. समन्वयक म्हणून डॉ. संजय टाले आणि प्रा. मेघा यांनी मोलाची भूमिका बजावली. विशेष अतिथी म्हणून योगेश एंटरप्रायजेसचे सीईओ योगेश भोंगाळे, एसव्हीएसएम एज्युकेशनचे श्रीकांत गुंजाळ, मार्केटिंग हेड शैलेंद्र सिंग तसेच इतर उपस्थित होते. मार्गदर्शन करताना विनायक भोंगाळे म्हणाले, ग्रामीण भागात आजही अनेक ठिकाणी आपल्याला संघर्ष पाहायला मिळतो. हा संघर्ष शिक्षणापासून सुरू होतो तो रोजगारापर्यंत येऊन थांबतो. अनेक ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना संधी अभावी आपले करिअर घडवता येत नाही. हजारातून बोटावर मोजण्या इतक्या तरुणांना संधी मिळते. त्यातून त्यांचे जीवन सावरते मात्र ज्यांना संधी मिळत नाही. त्यांना त्याच दलदलीत अडकून पडावे लागते. म्हणूनच या तरुणांना संधी उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न आहे. त्यासाठीच हा कॅम्पस ड्राईव्ह घेण्यात आला या कॅम्पस ड्राईव्हला अनेक विद्यार्थी तरुणांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळालेला आहे.

योगेश भोंगाळे म्हणाले करिअरसाठी केवळ एमबीए, इंजिनिअरिंग किंवा डॉक्टर होणे आवश्यक नाही. तुमचे कौशल्य, कामाबद्दलची निष्ठा आणि तुम्ही ते काम किती आत्मीयतेने करता, हेच यशाचे खरे मोजमाप आहे. तुमच्यात काहीतरी करून दाखवण्याची इच्छाशक्ती असेल, तर यश निश्चितच तुमचं आहे. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना स्वतःवरील विश्वास, सातत्य आणि प्रामाणिकतेचे महत्त्व पटवून दिले. या कॅम्पस ड्राइव्हदरम्यान विद्यार्थ्यांची बौद्धिक चाचणी, लेखी परीक्षा, तांत्रिक मुलाखत व व्यक्तिमत्त्व परीक्षण घेण्यात आले. या प्रक्रियेमुळे विद्यार्थ्यांची विचारशक्ती, संवादकौशल्य, व्यावसायिक समज आणि संघभावना यांचे मूल्यमापन झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एसव्हीएसएम एज्युकेशनच्या भारती पाटील व डॉ. संजय टाले यांनी केले.

### विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो

कॅम्पस ड्राईव्ह आयोजित करण्यात आलेल्या संग्रामपूर येथे विनायक भोंगाळे यांचा जन्म झाला. आज ते पुणे शहरातील एक नामवंत बांधकाम व्यावसायिक आहेत. आपल्या यशस्वी प्रवासातून त्यांनी समाजासाठी काहीतरी करण्याचा सातत्याने प्रयत्न केला आहे. त्यांच्यासारखे अनेक तरुण घडावेत यासाठी ते अविरत कार्यरत आहेत. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल कॉलेज प्रशासन, शिक्षकवर्ग व विद्यार्थ्यांनी योगेश एंटरप्रायजेस आणि त्यांच्या संपूर्ण टीमचे विशेष आभार मानले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो आणि रोजगाराच्या दिशेने ठोस पावले उचलण्याची प्रेरणा मिळते असे योगेश भोंगाळे म्हणाले.

# ‘निमा आयुर्वेद फोरम’ राष्ट्रीय अध्यक्षपदी वैद्य निलेश लोंढे

## आरोग्य विश्व: पिंपरी-चिंचवडसाठी अभिमानाची बाब

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**पिंपरी-चिंचवड शहराच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. शहरातील निर्विकार आयुर्वेद हॉस्पिटलचे संचालक वैद्य निलेश लोंढे यांची नुकतीच ‘निमा आयुर्वेद फोरम’च्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाली आहे. आयुर्वेद आणि युनानी चिकित्सा प्रणाली क्षेत्रातील देशातील सर्वात प्रतिष्ठित संस्था असलेल्या नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशनने (निमा) या फोरमची स्थापना केली आहे आणि पहिल्या अध्यक्षपदाचा मान वैद्य लोंढे यांना मिळाला आहे.**

वैद्य निलेश लोंढे यांनी यापूर्वी महाराष्ट्र आयुर्वेद प्रचार प्रसार समितीचे चेअरमन म्हणून दोन वर्षे यशस्वी कार्यभार सांभाळला आहे. या काळात त्यांनी आयुर्वेद डॉक्टरांच्या अनेक समस्यांसाठी आवाज उठवला. आरोग्य मंत्रालय, मुख्यमंत्री तसेच मंत्री महोदयांकडे बैठका घेऊन त्यांनी आयुर्वेद डॉक्टरांच्या अडचणी मांडण्याचा प्रयत्न केला.

आयुर्वेदाला विमा(INSURANCE) सुविधा मिळवून देणे, केंद्रीय कर्मचारी आरोग्य सेवा (CGHS) आणि माजी सैनिक आरोग्य सेवा (ECHS) मध्ये आयुर्वेद उपचारांचा समावेश करणे यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला. यासोबतच, आयुर्वेद वैद्यांच्या क्लिनिक आणि हॉस्पिटल रजिस्ट्रेशन, डे केअर इन्शुरन्स सुविधा, तसेच ‘आयुर्वेद’ आणि ‘पंचकर्म’ हे शब्द केवळ




नोंदणीकृत (REGISTERED) आयुर्वेद डॉक्टरांनीच वापरावेत यासाठी कायदा करण्याची मागणी त्यांनी लावून धरली आहे. क्रीडा (SPORTS) आणि औद्योगिक आरोग्य सेवेमध्ये आयुर्वेदाचा समावेश व्हावा, यासाठीही ही संघटना सक्रियपणे काम करणार आहे असे नवनिर्वाचित राष्ट्रीय अध्यक्ष वैद्य निलेश लोंढे यांनी सांगितले.

KAMALA Education Society

KAMALA EDUCATION SOCIETY'S

# PRATIBHA INSTITUTE OF BUSINESS MANAGEMENT

**AICTE Permanent ID: 1-3675161 | DTE Code: 6167**



Approved by AICTE | B+ NAAC Accredited

Permanently Affiliated to Savitribai Phule Pune University



## ADMISSIONS OPEN

2 Years' Full Time Postgraduate Courses

& 3/4 years' Full time Undergraduate Courses

Sharpen your leadership skills through

## MBA
Master of Business Administration

## MCA
Master of Computer Appplications

Join PIBM to become a competent professional ....

- International Certifications
- Live Industry Projects
- Startup & Business Alignments
- Research Ventures
- International Case Studies
- Industrial Visits
- Foreign Language
- Add on Skill Certifications
- Sports - Cultural Configurations
- Cross Domain Industry Specialisation
- Mentoring and Seed Funds for Startups
- International Alumni Interactions
- Association as Mentor with MCED
- Association as Mentor with IIT's
- Association as Mentor with Startup India

**AICTE Approved 3/4 Years' Full time Undergraduate Course**

## BBA
Bachelor of Business Administration

## BCA
Bachelor of Computer Applications

**Call for more details:**

**MBA/BBA : Prof. Gururaj - 8624991767 | Dr. Pallavi - 9225635556**

**MCA/BCA : Prof. Manish - 9823223336 | Prof. Surabhi - 9049004895**

www.pibmpune.org.in

Scan QR code to know more


Late Babanrao Gabaji Gawali Charitable Trust's
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JUNIOR COLLEGE
Powered by
JAI HIND EDUTECH
CBSE Affiliation No. : 1130741 • UDISE Code - 27252001012
BHOSARI CAMPUS : Sr. No. 203, Nr. Durwankur Lawns, Alandi Road, Bhosari, Pune-411039 (Maharashtra)
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL
ADMISSION
OPEN
2025-2026
Pre Primary to Class XII
LIMITED SEATS
Hurry up!!!
Bi-focal / Technical / Vocational Subject are available
For Science Stream
Computer Science
Crop Science
Electronics
Mechanical / Technical Automobile
Information Technology (IT)
For Commerce Stream
Banking
Marketing & Sales
Office Management
Small Industries & Self employment
Information Technology (IT)
CALL NOW : 9763441639 / 8657473241


BLOSSOM YOUR KNOWLEDGE
Swami Vivekanand Shikshan Prasarak Mandal's
GAYATRI GROUP OF SCHOOLS,
PUNE
ADMISSIONS OPEN
2025-26
PRE-PRIMARY
TO
HIGHER-SECONDARY
For more info
95277 64646 / 77967 67292


ADMISSION OPEN
Moraya Shikshan Sanstha
"यत् भावो – तत् भवति"
Computer 15 days Crash Course
Our Courses
> PowerPoint with animation
> Basic Excel
> Corel Draw
> Adobe Photoshop
> Scratch Animation
> 'C' Language
> Basic Java
> Basic Tally
From
5th May 2025
1 Hour / day
Monday to Saturday
Contact
8087706100
Registration started
Venue: Computer Lab,
V. K. Mate Highschool